# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.१२/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९/५/२०१६

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यासंदर्भातील निर्णय घेतांना विचारात घ्यावयाच्या कायदेशीर मतांबाबत खुलासा.

महोदय / महोदया,

राज्य निवडणूक आयोगाने दि. १२ नोव्हेंबर, २०१३ च्या आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावर नोटा बटनाची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. या निवडणुकांमध्ये उमेदवारांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यासंदर्भातील निर्णय घेतांना निवडणुकीमध्ये मतदान झालेल्या एकूण कायदेशीर मतांमध्ये ( valid votes ) नोटाला प्राप्त झालेल्या मतांचा समावेश करण्यात यावा किंवा कसे? या मुद्दयावर क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून सातत्याने विचारणा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या मुद्दयावर पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

"स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये अधिनियम / निवडणूक नियमातील तरतुदीनुसार उमेदवारांनी भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यासंदर्भातील निर्णय घेतांना मतदान झालेल्या एकूण कायदेशीर मतांच्या संख्येमध्ये ( valid votes ) नोटाला मिळालेल्या मतांचा समावेश करण्यात येऊ नये. "

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,
(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत- १) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
२) निवड नस्ती

D:\Mahale DS\Gen\NOTA.docx